पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – १९

**सभावृत्तांत**

दिनांक - **१७/०६/२०१६** वेळ – दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **१७/०६/२०१६** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

**१. मा. ताकवणे नंदा विकास - सभापती**
२. मा. आर.एस.कुमार
३. मा. पांढरकर निलेश शंकरराव
४. मा. भारती फरांदे
५. मा. पाडाळे निता विलास
६. मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव
७. मा. म्हेत्रे सुरेश रंगनाथ
८. मा. कुटे चारुशीला प्रभाकर

याशिवाय मा.गावडे – सह आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.डोईफोडे – सहा.आयुक्त हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले -</u>**

विषय क्र.१) सह शहर अभियंता (स्था) पदावर करावयाच्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबत**…**

विषय क्र.२) सहा.आयुक्त पदांवरील नियुक्त्यांबाबत **–** मा.भाऊसाहेब भोईर, मा.आर.एस. कुमार यांचा प्रस्ताव **–**

विषय क्र.३) कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देणेबाबत **–** मा.निलेश पांढरकर, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव **–**

विषय क्र.४) तुळजाईवस्ती-अजंठानगर प्रभाग क्र.१० झोपडपट्टी निर्मुलन अंतर्गत उपलब्ध निधीतून प्रभाग रस्त्यांवर दिवाबत्तीची सोय करणेबाबत **–** मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव **–**

विषय क्र.५) मोरवाडी वॉर्ड क्र.२७ झोपडपट्टी निर्मुलन अंतर्गत उपलब्ध निधीतून प्रभाग रस्त्यांवर दिवाबत्तीची सोय करणेबाबत-मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर

यांचा प्रस्ताव –

विषय क्र.६) प्रभाग क्र.१८ रावेत किवळे झोपडपट्टी निर्मुलन अंतर्गत उपलब्ध निधीतून प्रभाग रस्त्यांवर दिवाबत्तीची सोय करणेबाबत – मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव -

विषय क्र.७) प्रभाग क्र.२५ चिंचवड स्टेशन आनंदनगर झोपडपट्टी निर्मुलन अंतर्गत उपलब्ध निधीतून प्रभाग रस्त्यांवर दिवाबत्तीची सोय करणेबाबत – मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव –

विषय क्र.८) प्र.क्र.६१ दापोडी गावठाण एस.एम.एस. कॉलनी परिसरात रेडमिक्स पद्धतीने काँक्रीट पेव्हींग व गटर्स करणे व स्थापत्यविषयक कामे करणेबाबत – मा.निलेश पांढरकर, मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव...

विषय क्र.९) प्र.क्र.६१ आंबेडकर पुतळा ते सांगवी पुलापर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूने फुटपाथ करणे व रबर मोल्डींग पेव्हींग ब्लॉक बसविणेबाबत - मा.निलेश पांढरकर, मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव...

----------

दिनांक **०३/०६/२०१६** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १८)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**----------**

**<u>सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.</u>**

ठराव क्रमांक : ७५ विषय क्रमांक : १

दिनांक : १७/०६/२०१६ विभाग – प्रशासन

सुचक - मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक - मा.आर.एस.कुमार

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/४०२/२०१६, दि.१७/०६/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर सह शहर अभियंता(स्था.) अभिनामाची 3 पदे पे बॅन्ड र.रु. 15600-39100 ग्रेड वेतन र.रु. 7600 या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. या संवर्गात रिक्त होणारे 01 पद पदोन्नतीने भरण्याकरीता दि.30/05/2016 रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आली होती.

प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व कार्यकारी अभियंता(स्था)/उपशहर अभियंता पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, आरक्षण, गोपनीय अहवाल आणि सेवाज्येष्ठता इ. सेवाविषयक तपशील या बाबींची पडताळणी करुन श्री.दुधेकर रविंद्र विनायक यांचा कार्य. अभियंता(स्था.) पदावरील पदोन्नती नियमित होण्यापूर्वीचा 10.9 वर्षे आणि पदोन्नती नियमित झाल्यानंतरचा 8.5 वर्षे असा एकूण 19.2 वर्षे इतका अनुभव कालावधी विचारात घेऊन श्री.दुधेकर यांची कार्यकारी अभियंता(स्था.) पदावरील नियमित झाल्यानंतरची सेवा 8.5 वर्षे झाली असली तरी त्यांचा त्या पदावरील एकूण कार्यकाल व शासन परिपत्रक क्र. एसआरव्ही-2005/प्र.क्र.1/2005/12, दि.25/02/2005 मधील तरतूद पाहता, श्री.दुधेकर रविंद्र विनायक

यांना अनु. जाती प्रवर्गामधून सह शहर अभियंता(स्था.) पदावर मा.विधी/महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्यास सर्वानुमते शिफारस केलेली असल्याने श्री.दुधेकर रविंद्र विनायक, कार्यकारी अभियंता यांना अनु.जाती प्रवर्गातून सह शहर अभियंता (स्थापत्य) पे बॅन्ड र.रु.15600-39100 ग्रेड पे 7600 या वेतनश्रेणीमध्ये तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ७६ विषय क्रमांक : २

दिनांक : १७/०६/२०१६

सुचक - मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक - मा.आर.एस.कुमार

संदर्भ:- मा.भाऊसाहेब भोईर, मा.आर.एस.कुमार यांचा प्रस्ताव -

महापालिकेतील सहा.आयुक्त अभिनामाच्या मंजूर पदांवर शासनाकडील व महापालिकेकडील नियुक्त करावयाचे अधिका-यांचे प्रमाण निश्चित करण्यात आलेले आहे. त्यानुसार मनपा आस्थापनेवर “सहा.आयुक्त” पदावर महापालिकेच्या अधिका-यांकरीता असलेल्या पदांवर पदोन्नतीने नेमणूक करणेकामी प्रशासन अधिकारी समकक्ष पदावर काम करीत असलेल्या पदांवरील अनुभवाची अर्हता धारण न करणा-या अधिका-यांना अनुभवाची अर्हता शिथिल करुन सहा.आयुक्त पदाचा पदभार देण्यात यावा. तसेच महापालिकेच्या सहा.आयुक्तांकरिता निश्चित केलेल्या जागांवर शासनाकडील अधिका-यांची नियुक्ती न करता महापालिकेच्या अधिका-यांची नेमणूक करणेची कार्यवाही मा.आयुक्त यांनी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ७७ विषय क्रमांक : ३

दिनांक : १७/०६/२०१६

सुचक - मा.निलेश पांढरकर अनुमोदक – मा.सुरेश म्हेत्रे

संदर्भ:- मा.निलेश पांढरकर, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील जे कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) शासनाची व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण आहेत त्यांना उपअभियंता (स्थापत्य) पदी बढती देणे शक्य नसलेने त्यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ७८ विषय क्रमांक : ४

दिनांक : १७/०६/२०१६

सुचक - मा.भारती फरांदे अनुमोदक – मा.निलेश पांढरकर

संदर्भ:- मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव –

महाराष्ट्र राज्य शासनाचा निर्णय क्र.विघयो-१०२०००/१५९२/प्र.क्र.१८९/नवी-४, दिनांक ०५/०३/२००२ नुसार या योजने अंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील अनुसूचित

जाती तसेच नवबौध्द साठी आरक्षित असलेल्या प्रभागामध्ये तसेच अनुसूचित जातीच्या राखीव प्रभागाशिवाय इतर प्रभागातील ज्या वस्तीतील अनुसूचित जाती व नवबौध्द (विशेष घटक) यांची लोकसंख्या ५०% किंवा त्या पेक्षा अधिक आहे अशा वस्त्यांमध्ये या शासन निर्णयात खाली नागरी सुविधा विषयक कामे हाती घेता येतील. उपरोक्त शासन निर्णयानुसार तुळजाईवस्ती–अजंठानगर प्रभाग क्र.१० मध्ये रक्कम रु.४९,९९,०००/- (अक्षरी र.रु.एकोणपन्नास लाख नव्याण्णव हजार फक्त) LED दिवे बसविण्याच्या कामांस व येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ७९ विषय क्रमांक : ५

दिनांक : १७/०६/२०१६

सुचक - मा.भारती फरांदे अनुमोदक – मा.निलेश पांढरकर

संदर्भ:- मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव –

महाराष्ट्र राज्य शासनाचा निर्णय क्र.विघयो-१०२०००/१५९२/प्र.क्र.१८९/नवी-४, दिनांक ०५/०३/२००२ नुसार या योजने अंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील अनुसूचित जाती तसेच नवबौध्द साठी आरक्षित असलेल्या प्रभागामध्ये तसेच अनुसूचित जातीच्या राखीव प्रभागाशिवाय इतर प्रभागातील ज्या वस्तीतील अनुसूचित जाती व नवबौध्द (विशेष घटक) यांची लोकसंख्या ५०% किंवा त्या पेक्षा अधिक आहे अशा वस्त्यांमध्ये या शासन निर्णयात खाली नागरी सुविधा विषयक कामे हाती घेता येतील. उपरोक्त शासन निर्णयानुसार मोरवाडी वॉर्ड क्र.२७ मध्ये रक्कम रु.४९,९९,०००/- (अक्षरी र.रु.एकोणपन्नास लाख नव्याण्णव हजार फक्त) LED दिवे बसविण्याच्या कामांस व येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ८० विषय क्रमांक : ६

दिनांक : १७/०६/२०१६

सुचक - मा.भारती फरांदे अनुमोदक – मा.निलेश पांढरकर

संदर्भ:- मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव –

महाराष्ट्र राज्य शासनाचा निर्णय क्र.विघयो-१०२०००/१५९२/प्र.क्र.१८९/नवी-४, दिनांक ०५/०३/२००२ नुसार या योजने अंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील अनुसूचित जाती तसेच नवबौध्द साठी आरक्षित असलेल्या प्रभागामध्ये तसेच अनुसूचित जातीच्या राखीव प्रभागाशिवाय इतर प्रभागातील ज्या वस्तीतील अनुसूचित जाती व नवबौध्द (विशेष घटक) यांची लोकसंख्या ५०% किंवा त्या पेक्षा अधिक आहे अशा वस्त्यांमध्ये या शासन निर्णयात खाली नागरी सुविधा विषयक कामे हाती घेता येतील. उपरोक्त शासन निर्णयानुसार प्रभाग क्र.१८ रावेत किवळे मध्ये रक्कम रु.४९,९९,०००/- (अक्षरी र.रु.एकोणपन्नास लाख नव्याण्णव हजार फक्त) LED दिवे बसविण्याच्या कामांस व येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक : ८१ विषय क्रमांक : ७

दिनांक : १७/०६/२०१६

सुचक - मा.भारती फरांदे अनुमोदक – मा.निलेश पांढरकर

संदर्भ:- मा.भारती फरांदे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव –

महाराष्ट्र राज्य शासनाचा निर्णय क्र.विघयो-१०२०००/१५९२/प्र.क्र.१८९/नवी-४, दिनांक ०५/०३/२००२ नुसार या योजने अंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील अनुसूचित जाती तसेच नवबौध्द साठी आरक्षित असलेल्या प्रभागामध्ये तसेच अनुसूचित जातीच्या राखीव प्रभागाशिवाय इतर प्रभागातील ज्या वस्तीतील अनुसूचित जाती व नवबौध्द (विशेष घटक) यांची लोकसंख्या ५०% किंवा त्या पेक्षा अधिक आहे अशा वस्त्यांमध्ये या शासन निर्णयात खाली नागरी सुविधा विषयक कामे हाती घेता येतील. उपरोक्त शासन निर्णयानुसार प्रभाग क्र.२५ चिंचवड स्टेशन आनंदनगर मध्ये रक्कम रु.४९,९९,०००/- (अक्षरी र.रु.एकोणपन्नास लाख नव्याण्णव हजार फक्त) LED दिवे बसविण्याच्या कामांस व येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ८२ विषय क्रमांक : ८

दिनांक : १७/०६/२०१६

सुचक - मा.निलेश पांढरकर अनुमोदक – मा. भारती फरांदे

संदर्भ:- मा.निलेश पांढरकर,मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव –

मनपा स्थापत्य विभागाकडील निविदा क्र.१९/३१/२०१५-१६ अन्वये, प्रभाग क्र.६१ दापोडी गावठाण एस.एम.एस. कॉलनी परिसरात रेडमिक्स पद्धतीने कॉंक्रीट पेव्हींग व गटर्स करणे व स्थापत्य विषयक कामे करणेचे काम करणेकामी मे.जयराम कन्स्ट्रक्शन निविदा र.रु.१२,५४,१५०/- (अक्षरी र.रु.बारा लाख चौपन्न हजार एकशे पन्नास फक्त) पेक्षा ४४.९३% कमी दराने या ठेकेदाराकडून करारनामा करुन घेण्यास ठराव क्र.१४९२६, दि.०३/०२/२०१६ अन्वये यापुर्वी स्थायी समितीमार्फत मान्यता दिलेली आहे. सदर कामास महापालिका सभा ठराव क्र.६६३ दि.०६/०४/२०१५ अन्वये र.रु.१८,००,०००/- प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. दापोडी गावठाण, परिसरात ठिकठिकाणी कॉंक्रीट पेव्हींग करणे व नविन पेव्हींग ब्लॉक बसविणे गरजेचे आहे. सदर कामांतर्गत कॉंक्रीट पेव्हींग करणे व नविन पेव्हींग ब्लॉक बसविणे इ. कामे करणे आवश्यक असल्याने सदरचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करणेत आलेले आहे. त्याची सुधारीत अंदाजपत्रक र.रु.४९,८०,०००/- इतकी येत आहे व वाढीव र.रु.३१,८०,०००/- इतकी येत आहे. तरी ठेकेदाराकडून मंजूर दराने सुधारीत काम करुन घेण्यास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ८३ विषय क्रमांक : ९

दिनांक : १७/०६/२०१६

सुचक - मा.निलेश पांढरकर अनुमोदक – मा. भारती फरांदे

संदर्भ:- मा.निलेश पांढरकर,मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव –

मनपा स्थापत्य विभागाकडील निविदा क्र.८/५३/२०१५-१६ अन्वये, प्रभाग क्र.६१ आंबेडकर पुतळा ते सांगवी पुलापर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूने फुटपाथ करणे व रबर मोल्डींग पेव्हींग ब्लॉक बसविणेचे काम करणेकामी मे.एस.बी.सवई निविदा र.रु.१५,००,०००/- (अक्षरी र.रु.पंधरा लाख फक्त) पेक्षा ४०.००% कमी या ठेकेदाराकडून करारनामा करुन घेण्यास ठराव क्र.१५८३४, दि.२९/०३/२०१६ अन्वये यापुर्वी स्थायी समितीमार्फत मान्यता दिलेली आहे. सदर कामास महापालिका सभा ठराव क्र.६६३ दि.०६/०४/२०१५ अन्वये र.रु.२०,००,०००/- प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. दापोडी गावठाण, परिसरात ठिकठिकाणी नवीन रंगीत, रबर मोल्डींग पेव्हींग ब्लॉक बसविणे गरजेचे आहे. सदर कामांतर्गत रबर मोल्डींग पेव्हींग ब्लॉक बसविणे इ. कामे करणे आवश्यक असल्याने सदरचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करणेत आलेले आहे. त्याची सुधारीत अंदाजपत्रक र.रु.४९,९०,०००/- इतकी येत आहे व वाढीव र.रु.३४,९०,०००/- इतकी येत आहे. तरी ठेकेदाराकडून मंजूर दराने सुधारीत काम करुन घेण्यास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( नंदा विकास ताकवणे )**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/०४/कावि/३२५/२०१६
दिनांक : १७/०६/२०१६



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.